# स्त्री मुक्ती चळवळ अवलोकन – १

☐ विमल रणदिवे ☐

स्त्री मुक्ती चळवळीचा विस्तार गेल्या १०–१५ वर्षात वाढलेला आहे असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. या चळवळीमध्ये आज अनेक स्त्रीसंस्था नावारूपाला आलेल्या दिसतात. त्यांच्या नावाप्रमाणे त्यांच्या कृती व डावपेच वेगळे आहेत ही गोष्ट खरी आहे. पण उद्दिष्ट एकच–ते म्हणजे स्त्री मुक्ती चळवळ. दुसरी गोष्ट आज प्रकर्षाने नजरेसमोर येते ती म्हणजे रोजच्या रोज स्त्रीवर होणारे अनेक प्रकारचे अत्याचार. असा एकही दिवस जात नाही, ज्या दिवशी स्त्रीवर सामुदायिक बलात्कार, समाजविरोधी गुंडांनी महिलांवर केलेले लांछनास्पद व भीषण अत्याचार, कोवळ्या मुलीवर बापाने अगर कुटुंबातील कोणी नातलगाने केलेले भीषण वर्तन, या रोज येणाऱ्या दुःखद बातम्यांनी मन बेचैन झाल्याशिवाय रहात नाही. समाज कोणत्या दिशेने वाटचाल करीत आहे व त्याला कसा आळा घालता येईल याचा विचार निव्वळ स्त्री संघटनानीच नव्हे तर इतर सामाजिक संस्था व पक्ष यांनीही करण्याची वेळ आली आहे. काही वर्षापूर्वी हुंडाबळींची संख्या सरकारी आकडेवारीनुसार हिंदी-भाषिक राज्यांमध्ये जास्ती होती. आज हे प्रकार बंगाल, तामिळनाडूत, अगर केरळ राज्यांतही सुरू झाले आहेत, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. महिला चळवळीने स्वतंत्ररीत्या व सामुदायिक पद्धतीने या प्रथेविरुद्ध मोठी चळवळ उभारली, निदर्शने केली, वर्तमानपत्रे व माध्यमातर्फे त्याला चांगला प्रतिसाद मिळाला, पण हुंडाबळींची संख्या कमी न होता ती वाढत असल्याचे दिसते. या प्रथेविरुद्ध जनतेत ज्या प्रमाणात जागरूकता येणे जरूर होते तेवढी ती आलेली दिसत नाही. काही वरची अगर मध्यमवर्गीय ध्येयनिष्ठ कुटुंबे आपण हुंडा घेणार नाही म्हणतात व त्याप्रमाणे कृतीही करतात. या उलट या प्रश्नामागील काही स्त्रीयांच्या भूमिका–विशेषतः मुलांच्या आईची–जेव्हा तिच्या मुलीचे लग्न होणार असते व जेव्हा मुलाचे लग्न असते–भूमिका निरनिराळी बनते हे कठोर सत्यही चळवळीपुढे आले. त्यावर जेवढी कठोर भूमिका घेणे आवश्यक होते तेवढी चळवळीने घेतलेली दिसत नाही.

गेल्या काही वर्षात स्त्री चळवळीने विशेष काही प्रश्नांबाबत पुढाकार घेतलेला दिसतो व तो स्वागतार्ह आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. या महिला संघटनांनी आपले पाऊल निव्वळ स्त्रियांच्या प्रश्नांबाबतीत न उचलता या सरकारच्या नवीन आर्थिक व औद्योगिक धोरण, महागाई, टंचाई व इतर प्रश्नांबाबत आवाज उठवला, चळवळ केली. त्यासाठी सामुदायिक संघटनांबरोबर एकजूट करून कार्यक्रम केले. त्यांनी हे दाखवून दिले की स्त्री संघटना या केवळ स्त्रियांच्या प्रश्नांबाबत जागरूक असतात असे नव्हे तर सर्वसामान्य जनतेवर होणाऱ्या राजकीय व आर्थिक अन्यायाबाबतही त्यांचे पाऊल पुढे आहे ही एक नवी जागृती, निव्वळ स्त्रियांच्या पुरतीच नव्हे तर सर्व-सामान्य जनतेच्या प्रश्नांबाबत निर्माण झाली व त्याचे प्रात्यक्षिक एप्रिल १९९३ च्या महिन्यापासून ते ९ सप्टेंबरच्या भारत बंद या मोहिमांमधून दिसून आले. हजारो महिला आपापल्या स्त्रीमुक्तीच्या संघटनेच्या झेंडयाखाली एकत्र येऊन "रास्ता रोको" अगर "जेल भरो" आंदोलनात सामील झाल्या व या मोहिमेत शेतमजूर व किसान स्त्रियाही सामील झाल्या होत्या हे विशेष. या दृष्टीने महिला चळवळीचे पाऊल निश्चितच पुढे पडले. या चळवळीमुळे स्त्रीमुक्ती चळवळीची राजकीय जाणीव वाढली असे म्हटल्यास वावगे होणार नाही. येथे आणखी एक विशेष गोष्ट नमूद करावीशी वाटते व ती म्हणजे या चळवळीत उतरलेल्या सामुदायिक संघटनांना व पक्षांनाही स्त्रियांच्या सहकार्याची झालेली जाणीव.

स्त्रीमुक्ती संघटनांनी आपल्या संघटनेमधील ग्रामीण स्त्रियांचा अभाव याची नोंद जरूर घेतली पाहिजे. काही जनवादी महिला संघटनांनी ग्रामीण व झोपड-पट्टीतील स्त्रियांना त्यांच्या प्रश्नांवर जागरूक करण्याचे

प्रयत्न जरी केले असले तरी ते अजून अपुरेच आहेत असे म्हणावे लागेल. या स्त्रियांची संख्या भारतात ७० ते ८० टक्के आहे हे लक्षात घेता अजून आपल्याला बराच पल्ला गाठायचा आहे. या वर्गाच्या स्त्रियांना त्यांच्या प्रश्नावर जागरूक करून पश्चिम बंगालमध्ये ग्रामपंचायत निवडणुकीत त्यांनी प्रचंड यश मिळवले. काही विभागात तर सर्व स्त्रियाच निवडून आल्या. ही जागृति व त्याचा अभिमान व कार्य महिला चळवळीला पोषक ठरेल यात शंका नाही. परंतु इतर राज्यांत या ग्रामीण विभागात महिला चळवळ कोठपर्यंत पोचली याचा विचार करता स्त्रीमुक्ती चळवळीला अजून बराच पल्ला गाठायचा आहे असे म्हणावे लागेल. काही प्रगतीशील संघटना आत्मटीकात्मकदृष्टया यावर विचार करतात व त्यांना या कमतरतेची जाणीव आहे. जोपर्यंत या ८० टक्के स्त्रिया आपल्या मुक्तीचळवळीत सामील होत नाहीत, तोपर्यंत स्त्रीमुक्ती चळवळ ही लंगडीच राहील. या ग्रामीण महिला अत्यंत मागासलेल्या, धार्मिक प्रवृत्ती अत्यंत प्रबळ असलेल्या व सरंजामशाहीच्या दडपणाखाली रखडलेल्या व बुरसट विचारांच्या आधीन झालेल्या असतात. कित्येक राज्यात राजा राममोहनसारख्या सुधारणावादी विचाराचा कधीही स्पर्श झालेला नाही. स्त्रीचा जन्म निव्वळ पतिसेवा, मुलांची देखभाल यासाठीच आहे ही त्यांची पक्की खात्री असते. या बुरसट व मागासलेल्या रूढीपरंपरेच्या विचारातून तिला बाहेर काढून सामुदायिक चळवळीत आणणे हे एक दुष्कर कार्य आहे, पण ते करणे अत्यंत आवश्यक आहे. या कामाला त्यांच्या कुटुंबियांची सहानुभूती लागते व त्यांच्या सहकार्याशिवाय या स्त्रियांना बाहेर काढणे कठीण असते.

या बाबतीत एक उदाहरण देणे जरूरीचे आहे. ज्या शेतमजूर महिला अगर इतर महिला त्यांच्या सामुदायिक संघटनेत असतात, त्या त्यांच्या व्यवसायी बंधू बरोबर त्यांच्या मागण्यांसाठी बरोबरीने पुढे येतात. मग त्या शेतमजूर, किसान, खाणकामगार अगर इतर धंद्यातील असोत. चळवळीबरोबर त्या जागृत होतात, पुढारी बनतात, भाषणेही देतात. या भागीदारीमुळे, त्यांच्यातील मागासलेपणा व बुरसटलेले संस्कार हळू हळू कमी होत जातात, त्या वर्गजागृत होतात व लढ्यातील आपले शत्रु कोण, मित्र कोण हे त्यांना समजू शकते इतकेच नव्हे, तर आपल्या लढ्याचे आकर्षण अखेरीस त्यांना इतके वाटते की आपल्या पतीचा न जाण्याचा हुकूम अगर परवानगीचीही त्या वाट पहात नाहीत हा अनुभव आहे.

यादृष्टीने स्त्रीमुक्ती चळवळीने या ग्रामीण स्त्रियांच्या व कामगारस्त्रियांच्या प्रश्नांकडे पाहिले व त्यांचे प्रश्न इतर स्त्रियांच्या प्रश्नाबरोबर हाताळले तर या स्त्रियांची राजकीय व सामाजिक जागृति वेगाने होण्यास मदत होईल. तीच गोष्ट ज्या कामगार स्त्रिया, मग त्या मध्यमवर्गाच्या असोत किंवा कामगार वर्गातील असोत, पुरुषांच्या बरोबरीने काम करतात, मालकांविरूद्ध वर्गसंघर्ष लढ्यात बरोबरीने उभ्या रहातात व त्यांच्या खास प्रश्नांसाठीही लढ्यासाठी पुढे येतात, त्या आपल्या मागण्या मिळवून घेतात, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. याचा स्पष्ट अर्थ काय होतो? त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य, व संघटनेतील लढाऊपणा याचे मीलन झाल्यामुळे स्त्रीमुक्ती चळवळीचे पाऊल पुढे पडते. बाहेरील जगाचे आकलन, राजकीय जागृति, स्वाभिमान त्यांच्यात निर्माण होतो. स्त्रीमुक्तीचळवळीने या प्रश्नाची दखल घेऊन त्यांच्या संघटनांबरोबर व त्यांच्या विशिष्ट प्रश्नांबाबत चर्चा करून, त्यांना स्त्रीमुक्तीचळवळीत खेचले पाहिजे. या नोकरी करणाऱ्या स्त्रियांनाही हुंडा, महागाई व विशेषतः कामाच्या ठिकाणी होणारा शारिरीक छळ यांना तोंड द्यावे लागते. मुख्य मुद्दा म्हणजे स्त्री मुक्तीचळवळ ही निव्वळ घरगुती स्त्रियांपुरतीच रहाता कामा नये. आजचे स्त्रीमुक्तीचळवळीचे स्वरूप मुख्यतः घरगुती स्त्रियांपुरते मर्यादित झाले आहे. त्याचा विस्तार नोकरी करणाऱ्या स्त्रियांपर्यंत जाणे जरूरीचे आहे. या दोन्ही वर्गाच्या स्त्रियांची एकजूट स्त्रीमुक्तीचळवळीला पुढे नेण्यास मदत करील.

आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीचा एक विशेष पैलु म्हणजे स्त्रीसंघटनांना एकजूट करण्याची झालेली जाणीव. प्रत्येक लहान अगर मोठ्या संघटनांना आपली विशिष्ट मोहीम, अगर प्रश्न आपल्या एकटीच्या ताकदीने सोडविता येणार नाही ही जाणीव झाल्यामुळे, अनेक प्रश्नांवर त्या आज एकत्र येत आहेत. सामु-

दायिक पद्धतीने सभा घेऊन कार्यक्रम ठरवीत आहेत. यात अडचणी येत नाहीत असे नाही. पण बहुसंख्यांक मताने निर्णय घेऊन प्रश्न सोडविले जातात ही एक स्वागतार्ह घटना आहे.

स्त्रीमुक्ती चळवळीने जर आपल्या मुक्तीसाठी पुरुष बंधुवर्गाची सक्रीय सहानुभूती व पाठिंबा मिळवला नाही तर ही चळवळ पुढे जाणे कठीण आहे. निव्वळ स्त्रियांना जागृत करणे व त्यांच्या मागण्यांसाठी लढा देणे एवढेच काम स्त्रीसंघटनेचे होता कामा नये. ते कार्य त्या करतातच. आपला एकंदर समाज अत्यंत मागास-लेला, पुरुषप्रधान, सरंजामशाही, भांडवलदारी विचा-रात रुतलेला आहे. या समाजातील पुरुषवर्ग, मग तो मालक असो, सरकारी नोकर असो, अगर मंत्री असो, या सरंजामदारी समाजातील सर्व दुर्गुण त्यांच्या अंगी असणे स्वाभाविक आहे. स्त्रियाही या रूढी व परंपरांना मानीत असतात. आपल्या मागण्यांबाबत या पुरुष वर्गाला जागृत करणे, सुशिक्षित करणे, त्यांच्यात सहा-नुभूती निर्माण करणे व हा लढा अगर मागण्या दोघांच्या एकजुटीने लढल्यासिवाय त्या मागण्या प्राप्त होणार नाहीत, हे त्यांना पटवून देणे आवश्यक आहे. त्यांच्या विरोधात्मक पवित्रा. समजुतीने अगर कधी आक्रमक पवित्रा घेऊन कधी बंडखोर होऊन बदलला पाहिजे. हे कार्य न केल्यास आपली चळवळ ही निव्वळ स्त्री विरुद्ध पुरुष अशी होईल. आज काही संघटना "नारीवादी" (Feminist) नावाने काम करतात, ज्यांचा रोख निव्वळ पुरुषवर्गाविरुद्ध असतो या संघट-नांचा रोष योग्य नाही असे नाही. कारण कित्येक पुरुष स्त्रीला हीन मानतात, त्यांचा अपमान करतात व नाना प्रकारचा छळ करतात. ही गोष्ट जरी खरी असली तरीसुद्धा स्त्री व पुरुष हे दोन्ही घटक या भांडवलदारी व सरंजामशाही समाजाचे घटक आहे. या समाजात जन्मल्यामूळे त्या दोघांच्या अंगी हे दुर्गुण स्वाभाविक-रित्या येतात. स्त्रीमुक्ती चळवळ करतांना व स्त्रियांना त्यांच्या प्रश्नांवर जागरूक करतांना आपली चळवळ पुरुषविरोधी होणार नाही याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः जेव्हा काही 'नारीवादी' संघटना हाच एक विषय घेऊन स्त्रीविरुद्ध पुरुषजात अशी भूमिका घेतात व चळवळ उभारतात त्याची दखल घेणे जरूरीचे आहे.

आज आपल्या देशाची राजकीय व सामाजिक परिस्थिति अत्यंत बिकट आहे. एका बाजूला कॉंग्रेसचे सरकार जागतिक बँकेकडून कर्ज घेऊन नवीन कारखाने येथे सुरू करीत आहेत व जुने कारखाने बंद पाडत आहे. बेकारीने लोकांना हैराण केले आहे. शिक्षण संस्थांचा बोजवारा उडत आहे. भरमसाट महागाईने जनता हैराण झाली आहे. दुसऱ्या बाजूला जातीय शक्ति नानाप्रकारे देशात धुडगुस घालून समाजातील निर-निराळ्या जातीजमातीमध्ये वैमनस्य निर्माण करीत आहेत. या दंगलीत हजारो नागरिक मृत्यू पावले. त्यांतच एक नवीन संकट बॉंबस्फोट व त्यात होणारी हत्या-सतत चालू आहे. हिंदु-मुस्लिम जमातींचा जातीयवाद आज सर्व सामान्य माणसाला भेडसावीत आहे.

आपल्या देशातील स्त्रिया मग त्या कोणत्याही जमातीच्या असोत, जातीयवादाला प्रथम बळी पडतात. कारण उघड आहे, अशिक्षितपणा, राजकीय जागृतीचा अभाव व बुरसटलेल्या प्रवृत्ती यामध्ये आपल्या देशा-तील बहुसंख्य स्त्रिया, विशेषतः ग्रामीण भागातील, रुतलेल्या आहेत. अशा परिस्थितीत जर आपल्या स्त्री संघटना पुढे आल्या नाहीत, त्यांना धीर देऊन आपल्या पायावर त्यांना उभे केले नाही तर या स्त्रीमुक्ती चळवळीला काही अर्थ रहाणार नाही. जो काही ध्येयवाद आपल्या स्त्रीसंघटनेत आहे तो जोपासला पाहिजे व त्या ध्येयवादाने प्रेरित होऊन आपल्या संघटनेतील दोष दूर करून एकजुटीने स्त्रीमुक्तीसाठी चळवळ करण्याचे ध्येय पुढे राखणे हाच एकमेव मार्ग स्त्री चळवळीचे अवलोकन करतांना लक्षात ठेवणे जरूरीचे आहे.

# स्त्रीमुक्ती चळवळ अवलोकन – २

☐ अदिती अडसूळ ☐

स्त्री मुक्तीची व्याख्या खऱ्या अर्थाने व्यापक आहे. गेली वीस वर्षे शहरात आणि खेडयात जे थोडेफार काम स्त्रियांचे बाबतीत झाले, त्यामुळे कार्यक्रम पत्रिकेवर एक दुर्लक्षित विषय आला. शहरातील सामाजिक कार्य करणाऱ्या काही सुविद्य भगिनींना स्त्रीमुक्ती चळवळीचे महत्त्व पटले, म्हणूनच त्या भगिनी कार्यावर निष्ठा ठेवून कार्य सातत्याने करीत आहेत. अशा कार्यकर्त्यांचा आज तुटवडाच आहे. त्यामुळे आर्थिकदृष्टया मागासलेल्या तळागाळातील स्त्रियांपर्यंत स्त्रीमुक्ती चळवळ पोहोचलेली नाही, पोहचली आहे हा निव्वळ आभास आहे.

खेडयातील बहुसंख्य स्त्रिया दिवसभर घरकामात व रानावनात काबाडकष्ट करण्यात गुंतलेल्या असतात, त्यांना विश्रांती ही ठाऊकच नाही. अशा स्थितीत खेडयातील महिला शहरातून खेडयात जाणाऱ्या कार्यकर्त्यांना वेळ देऊ शकत नाही. खेडयात अंधश्रद्धा, अज्ञान, दारिद्रय इत्यादींनी स्त्रिया ग्रासलेल्या आहेत. त्यांच्यावर होणारा पुरुषी अत्याचार–अन्याय हे सोसणे यालाच त्या स्त्रीधर्म मानतात. परंपरेने अशा प्रकारची प्रवृत्ती बनलेली आहे. त्यामुळे खेडयात काम करणे अवघड जाते.

स्त्रीमुक्तीची चळवळ बऱ्याच स्त्रीसंघटनांनी खेडयात नेण्याचा प्रयत्न चालवलेला आहे. त्यात त्यांना म्हणावं असं यश प्राप्त झालेलं नाही. त्यासाठी प्रथम स्त्रियांना स्त्रीमुक्ती म्हणजे काय, हे नीट समजावून द्यावयास हवे व स्थानिक कार्यकर्त्या निर्माण करायला हव्यात आणि त्यांच्यामार्फत स्त्रीमुक्ती चळवळ खेडयात रुजवली पाहिजे.

खेडयामध्ये पूर्वी स्त्रियांवर अनाचार–अत्याचार घडत होते, त्यांचे खूनही होत होते. पण हे सारे गुन्हे त्या खेडयाच्या बाहेर कोणालाही समजत नसत, कारण गावगुंडीमुळे तेथील लोकांवर मोठा वचक असे. तोंड दाबून बुक्यांचा मार असा खेडयांचा दंडक होता. आज खेडयात काय किंवा शहरात काय स्त्रियांवर बलात्कार, अत्याचार व अनाचार असे अमानुष प्रकार घडतात, पण ते वर्तमानपत्र माध्यमातून वाचायला मिळतात. त्यावरून अलिकडे पूर्वीपेक्षा अधिक स्त्रियांवर अन्याय घडत असून खूनही होतात असा समज होतो. त्याची चौकशी किती होते ? यामुळे महिलांना किती न्याय मिळतो ? हे स्त्रीमुक्ती चळवळीत कार्य करणाऱ्या महिलांना चांगले ठाऊक आहे.

स्त्रीमुक्ती चळवळ ही शहरापुरती राहिली नसून तिची हवा खेडयातही पोहचली आहे. परंतु ती हवा खेडूत स्त्रियांना अद्याप पचलेली दिसत नाही. म्हणून स्त्रीमुक्ती चळवळ शहरातच घुटमळत आहे असे वाटते.

कोणतीही चळवळ मग ती धार्मिक असो, राजकीय असो, सामाजिक असो ती गतिमान होण्यासाठी पैशाची तिला नितांत गरज आहे. त्याकरिता पैशाची तरतूद संघटनेने करायलाच हवी. मग देणगीच्या रूपाने अगर परकीयांच्या मदतीने स्त्रीसंघटनेची आर्थिक बाजू मजबूत करण्यास हरकत नाही.

राजकीयदृष्टया पुरुषवर्ग स्त्री संघटनांना पाठींबा देतात. त्यात त्यांचा राजकीय हेतू असतो. संघटनेच्या स्त्रिया आपल्याला राजकारणात पाठिंबा देतील यादृष्टीने तो स्त्रीसंघटनेला पाठिंबा देतो. त्याच्या या पाठिंब्याने त्याच्या मतांची, विचारांची मानसिक गुलामगिरी न कळत स्विकारली जाते. त्यामुळे स्त्रीमुक्ती चळवळीचा उद्देश बाजूला राहून चळवळीला शिथीलता येते. स्त्री संघटना कात्रीत सापडतात.

स्त्री मुक्तीच्या चळवळीचा ओघ काळाच्या ओघाबरोबर धावत आहे. त्या वाहत्या ओघाला राजकीय स्वरूप येऊ पाहातय. हा हिरवा कंदील की लाल कंदील

समजावयाचा ? स्त्री मुक्ती चळवळ सातत्याने पुढे न्यावयाची असेल तर स्त्रिया आर्थिकदृष्टचा स्वावलंबी होण्यास खेड्यातील दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, सामुदायिक शेती, घरगुती उद्योग इत्यादी व्यवसायातून निर्माण होणाऱ्या उत्पादनास बाजारपेठ मिळवून देणे आवश्यक आहे. यामुळे स्त्रिया आर्थिकदृष्टचा स्वावलंबी होतील अन् स्त्रीमुक्ती चळवळीचा ओघ गतिमान होईल.

स्त्रीमुक्ती चळवळीचे कार्य करीत असताना त्यांना साक्षरतेची गोडी वाटली पाहिजे, त्याची महती पटली पाहिजे हे अत्यंत महत्वाचे काम स्त्री संघटनांनी करावयास पाहिजे. त्या ज्ञानी झाल्यावरच त्यांना न्याय-अन्याय याची जाण होणार आहे, हे स्त्रीमुक्तीच्या कार्यकर्त्यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. सध्या शासनाने स्त्रियांसाठी प्रत्येक क्षेत्रात ३० टक्के जागा राखीव ठेवलेल्या आहेत. राजकारणातही ३० टक्के जागा राखीव ठेवल्या आहेत, हे शासनाने जाहीर करताच पुरुषवर्ग गोंधळला; पण पुरुषवर्ग हा हाडाचा राजकारणीच. त्याने विचार केला की, ३० टक्के निवडून येणाऱ्या भगिनी वा बायका या आपल्या असून आपणच निवडून देतो म्हणजे आपणच निवडून येतो फक्त फॉर्ममध्ये पहिले नाव बदलून दुसरे येते इतकेच. निवडून येणाऱ्या बहुतेक स्त्रिया अपरिचित, अशिक्षित, रूढीप्रिय किंवा सतत राजकारणी पुढाऱ्याच्या मतावर अवलंबून असतात.

राजकीय पक्षांची राजकीय खेळीला सुरवात झाली. प्रत्येक राजकीय पक्षान आपल्या पक्षातर्फे स्त्री उमेदवार उभा करून जिद्दीने निवडून आणण्याचा प्रयत्न केला. संघटनांमार्फत स्त्रियांना सुशिक्षित करावे व त्यांना पुढच्या निवडणूकीत उभे करून जिद्दीने निवडून आणावे. तेव्हाच स्त्रीमुक्तीचे कार्य यथायोग्य झाले असे समजण्यास हरकत नाही.

खेड्यातील बहुसंख्य लोक आर्थिकदृष्टचा दुर्बल आहेत. शिक्षण नाही, अज्ञान आणि दारिद्र्य यांनी पछाडलेले आहेत. उद्योग नाही. रोजीरोटी काम केल्याशिवाय मिळत नाही. मरेमरेतो कष्ट करून कसेबसे पोट भरायचे, अन् दारू पिऊन झोपायचे असे जीवन आहे त्यांचे. दारूभट्टचा वाढल्या, बेकारी वाढली, ना काम ना धंदा. त्यात टी. व्ही. ने भर टाकली. अर्धनग्न स्त्रीयांची नाचगाणी, दारू पिऊन धुंद होवून चाललेला धांगडधिंगा, आजची बाल आणि तरुण पिढी पाहते. त्यातूनच त्यांची दुष्ट प्रवृत्ति फुलते आणि मग ते वाममार्गाला लागतात. चोऱ्या, मारामाऱ्या, बलात्कार हे सगळे चाळे टी. व्ही. पासून निर्माण होतात. टी. व्ही. चे कार्यक्रम नैतिकदृष्टचा अधोगतीला नेणारेच ठरत आहेत. गांत बहुसंख्य मुले बिघडतात. सत्परिस्थितीला आळा घालण्यासाठी सरकारने कायदे करून ते जारी करावेत. याबाबत सर्व स्त्री संघटनांनी एकत्र येऊन ठोस कार्यक्रम हाती घेतला पाहिजे.


With Best Compliments From

**M/s. Accurate Sales & Services Pvt. Ltd.**

67, Hadapsar Industrial Estate.
Pune : 411 013.

PRECISION GAUGES,
MEASURING INSTRUMENTS,
MACHINE TOOLS,
3-CO ORDINATE MEASURING MACHINE.

# स्त्रीमुक्ती चळवळ, अवलोकन – ३

**शांताराम पंदेरे**

१९७५ या आंतरराष्ट्रीय महिला वर्षापासून जगभर आणि भारतभर महिलांच्या प्रश्नांची चर्चा सुरू झाली. या अठरा वर्षांत महिलांच्या संदर्भात निश्चितपणे काही महत्वाच्या घडामोडी घडल्या. याचे सर्व श्रेय येथील महिलांची चळवळ आणि तिच्या नेतृत्वाला द्यायला हवे. यातील काहींची नोंद येथे करीत आहे,

१) विविध संघटना, चळवळीसोबतच महिलांची स्वतंत्र चळवळ करण्याची गरज दिसली. नवनवीन महिला संघटना उदयाला आल्या.

२) स्त्रीवादी दृष्टिकोनातून विश्वातील प्रत्येक प्रश्नाकडे–घटनेकडे पहाता येते याची परत एकदा आठवण या निमित्ताने झाली.

३) स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा सुरू झाली, या प्रश्नांची व्याप्ती व खोली जाणवली.

४) समतेकडे (टोवर्डस् इक्वालिटी), एन. पी. पी., श्रमशक्ती हे महत्वाचे दस्तऐवज या निमित्ताने तयार झाले आणि त्यावर चर्चा सुरू झाली.

जागतिक पातळीवर DAWN (पहाट) अहवालाची निर्मिती व चर्चा झाली.

५) भारत सरकारने महिला आयोग नेमला आणि त्याला वैधानिक दर्जा प्राप्त झाला. त्या अनुरूप प्रत्येक राज्यात महिला आयोग अस्तित्वात आला.

६) कुटुंब न्यायालय, महिला दक्षता समित्या, महिला पोलिस चौक्या अस्तित्वात आल्या

७) राजकीय पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी तीस टक्के राखीव जागा ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला व त्याची अंमलबजावणीही झाली.

८) महिलांच्या प्रश्नावर चळवळी उभ्या राहिल्या. त्यातूनच शरद जोशींच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेचा 'लक्ष्मी मुक्ती' कार्यक्रम पुढे आला; तर ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील 'भूमिहीन हक्क संरक्षण समिती' चा 'गायरान जंगल जमिनीचा ७।१२ नवरा–बायकोच्या नावावर' हा कार्यक्रम राबविण्यात आला. १९९० च्या महाराष्ट्र शासनाच्या 'जी आर' नुसार राज्यातील सुमारे एक लाख भूमिहीन स्त्री–पुरुष कुटुंबांच्या नावावर ही जमीन झाली

९) केन्द्र सरकारच्या महिला व बालकल्याण मंत्रालयाचा दर्जा वाढला आणि एकूण अर्थसंकल्पात महिलांच्या विकासासाठी किती निधी ठेवलाय याची किमान चर्चा सुरू झाली.

१०) प्रसिद्धी माध्यमातून महिलांच्या घटनांची दखल घेण्याचे प्रमाण वाढले. ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या प्रमाणात साजरा होऊ लागला.

११) महिलांच्या प्रश्नावरील साहित्य (विशेषतः महिलांनीच लिहिलेले) निर्माण झाले. त्यात ललित साहित्याचीही भर पडली.

१२) महिलांनी महिलांच्या प्रश्नांवर चालविलेली नियतकालिके मोठ्या संख्येने निघाली. दूरदर्शन, आकाशवाणी, नाटक आदी माध्यमांतून महिलांच्या प्रश्नांची चर्चा सुरू झाली.

१३) महिलांच्या प्रश्नांवर संशोधन करण्याचे प्रमाणही वाढले.

१४) विविध क्षेत्रातील महिलांची संख्या जरी अत्यल्प असली तरी तेथील महिला आत्मविश्वासाने नव्या जाणीवेने कार्यरत झाल्या.

१५) एकंदरीतच या दोन दशकात स्त्रियांना स्वतःचा चेहरा लाभला. ह्या बाबी निश्चितच महत्त्वाच्या आहेत स्त्रियांच्या प्रश्नांची दखल घेण्याची शक्ती या चळवळीने निश्चितच निर्माण केली आहे.

## स्त्रीमुक्ती चळवळ स्त्रीसमूहाची चळवळ का बनली नाही ?

स्त्रीमुक्ती चळवळीने मागील दोन दशकादरम्यान जे ठसे उमटवले त्यांची दखल घेतल्यानंतरही एक प्रश्न

सातत्याने माझ्यासमोर उभा रहातो; तो म्हणजे ही चळवळ स्त्रीसमूहाची चळवळ का बनली नाही ?

आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीत मागील कालखंडात सातत्याने कार्यरत असलेल्या स्त्रीकार्यकर्तीचा मोठा संच उभा राहिला. संशोधन–अभ्यास, लेखिका, नाटककार, राजकीय कार्यकर्ती, प्रशासक, सामाजिक अशा विविध क्षेत्रात या कार्यकर्त्यांचा संच उभा राहिला परंतु या साऱ्याजणी तमाम महाराष्ट्रीय स्त्रियांमध्ये आजही परिचित नाहीत, शेतकरी–भूमिहीन–शेतमजूर, कामगार, दलित–आदिवासी–भटके–विमुक्त आदी सामाजिक समूहांमध्ये या स्त्रियांना अजिबात स्थान नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन चळवळीच्या नेत्या आयु. शांताबाई दाणी (नाशिक) या दलितांमध्ये प्रसिद्ध आहेत. समाजवादी चळवळीच्या नेत्या साथी मृणालताई गोरे आणि मार्क्सवादी पक्षाच्या नेत्या कॉ. अहिल्याबाई रांगणेकर, या मुंबई–पुण्याच्या मध्यमवर्ग, कामगार आणि काही झोपडपट्ट्यांमध्ये माहीत आहेत. विशेषत: महागाईविरोधी महिला कृती समितीच्या चळवळीमुळे या नेत्या शिक्षितांमध्ये प्रसिद्ध झाल्या. माकपाच्या जेष्ठ नेत्या कॉ. गोदाराणी परुळेकर या ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचे नेतृत्व करीत होत्या. या सर्व नेत्या राजकीय चळवळीतील आहेत. त्यानंतरच्या पिढीतील स्त्रीमुक्ती चळवळीतील महिला कार्यकर्त्या सामान्य महिलांमध्ये स्थान मिळवू शकल्या नाहीत. त्यांचे स्थान प्रामुख्याने शहरी, शिक्षित, मध्यम–उच्च मध्यम वर्ग आणि उच्चवर्ण–जातीतील स्त्रियांमध्येच निर्माण झाले.

या महिला कार्यकर्त्यांनी घेतलेले प्रश्न व त्यामागील भूमिकेवर त्यांच्या वर्ग–जातीच्या मर्यादा पडलेल्या दिसतात. त्यामुळे त्यांचे लढेही (Symbolic) प्रतिकात्मकच राहिले. १९७५ पासून जी स्त्रीमुक्ती चळवळ सुरु झाली असे म्हणतात, ते भारतीय स्त्री मुक्तीवादी स्त्रीपुरुष समतावादी परंपरा विचारात घेत नाहीत किंवा मानत नाहीत असेच म्हणावे लागते. त्यांच्या प्रेरणा या पाश्चात्त्य राहिल्या. त्यांचे महत्वाचे दिन, घटना, प्रतिकं या पाश्चात्यच–भारताबाहेरील राहिल्या. या परंपरेला वर्ण–जातीचा रंग नाही. याऊलट भारतीय समतावादी परंपरेला वर्णजातीचा संदर्भ आहे. त्यामुळे भारतीय पुरोगामी, विशेषत: समाजवादी, साम्यवादी (अपवाद डॉ राममनोहर लोहिया आणि कॉ. शरद पाटील यांचा) चळवळीने या भारतीय परंपरेकडे फारसे लक्ष दिले नाही. भारतीय समता लढ्याचे आद्य प्रणेते गौतम बुद्ध, संत कबीर, संत तुकाराम, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दखल या अडीच–तीन दशकातच अधिक प्रमाणात घेतली जाऊ लागली. महात्मा गांधी आणि डॉ आंबेडकर यांच्याकडे फक्त परस्परविरोधी विचारांचे नेते या एकाच दृष्टीने पाहिले. स्वातंत्र्यलढ्याच्या दरम्यान डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या मानवमुक्ती लढ्याकडे दलित–अस्पृश्यांचा लढा म्हणून पाहिले. त्यांना केवळ अस्पृश्यांचे नेते म्हणून मानले. स्वातंत्र्यलढा आणि डॉ. आंबेडकरांचा लढा यांचा काहीही संबंध नाही असेच मानले. या उलट स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ हेडगेवार यांना राष्ट्रभक्त मानले आणि महात्मा फुले – शाहूंपासून डॉ. आंबेडकरांपर्यंतच्या क्रांतीकारकांच्या हेतूविषयी वारंवार शंका उपस्थित करण्यात आल्या. वास्तविक पहाता विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत फक्त महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर याच दोन नेत्यांनी स्त्रियांना घराबाहेर आणले व चळवळ व्यापक केली होती. परंतु येथील स्त्रीमुक्तीवादी चळवळीला हे नेते आपल्या चळवळीची स्फुर्तिस्थाने वाटली नाहीत. त्यामुळेच येथील फुले–आंबेडकरी चळवळ (दलित–रिपब्लिकन चळवळ) आणि स्त्रीमुक्ती चळवळ जवळ येवू शकल्या नाहीत.

समाजातील विविध सामाजिक संस्थांमधील "कुटुंब" ही सर्वात लहान सामाजिक संस्था आहे. या संस्थेतील मानवी संबंध फार नाजूक असतात. याच संबंधांभोवती स्त्रीमुक्ती चळवळ राहिली. त्यापेक्षा व्यापक सामाजिक संस्थांबाबत चळवळीने फारशी भूमिका घेतली नाही. परिणामी या समाजातील महत्त्वाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय प्रश्नांबाबत, चळवळींबाबत स्त्रीमुक्ती चळवळ जागृत राहिली नाही.

१९८२ ते १९९२ पर्यंत महाराष्ट्रात भूमिहीन शेतमजूरांची रोजगार, वेतन व जमिनीच्या प्रश्नांवर चळवळ चालली. लाखोंच्या संख्येने हा दलित, आदिवासी,

भटका–विमुक्त आदी बहुजन समाज रस्त्यावर आला. या चळवळीत निम्मी संख्या स्त्रियांची होती. या चळवळीतील भूमिहीन हक्क संरक्षण समितीने गायरान–जंगल जमिनीचा सात–बारा स्त्री–पुरुष, नवरा–बायको यांच्या संयुक्त नावावर द्यावा अशी मागणी केली. त्यासाठी गाव पातळीपासून राज्यस्तरापर्यंत चर्चा केली. या मागणीला पोषक मानस बनविले. अखेर १९९० साली नवा 'जीआर' महाराष्ट्र सरकारला काढावा लागला. या चळवळीत महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती चळवळीने सहभागी व्हावे एवढेच नाही तर या व्यापक व्यासपीठावर आपले विचार मांडावेत व संपूर्ण चळवळ त्या दिशेने पुढे न्यावी अशी अपेक्षाही होती. परंतु एकाही स्त्रीमुक्तीवादी संघटनेने, व्यक्तीने त्याला प्रतिसाद दिला नाही. फक्त समितीमधील घटक पक्ष–संघटनांच्या महिला आघाडीच्या कार्यकर्त्या–नेत्या यात सक्रिय राहिल्या. या उदाहरणातून आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीचे मानस, सामाजिक चारित्र्य दिसते. हीच या चळवळीची मोठी मर्यादा आहे.

## बदलते संदर्भ : वाढते अत्याचार

चळवळींबरोबरच विविध घटकांवरील अत्याचार वाढलेले दिसतात. नवनवीन मार्ग–प्रकार पुढे येताना दिसतात. याचा संदर्भ येथील सामाजिक चौकटीशी आहे. समाजातील विविध संस्थांचे स्वरूपही बदलत आहे. जुनी वर्ण–जाती व्यवस्था नवा चेहरा घेऊन पुढे आली आहे. जुनी कुटुंबव्यवस्था नव्या स्वरूपात पुढे येत आहे. जुनी अर्थव्यवस्था नवे रूप घेऊन पुढे आली आहे. त्याबरोबर राजकीय व्यवस्थाही बदलत आहे. साऱ्यांचे संदर्भ बदलत आहेत. यांच्याकडे बारकाईने पाहिले नाही तर प्रश्नांचे बदलते स्वरूप लक्षात येणार नाही. साऱ्या चळवळी येथील व्यवस्था तिच्या स्थिरतेसाठीच वापरील आठव्या पंचवार्षिक योजनेत स्वयंसेवी संस्थांचा विकासाच्या प्रक्रियेत सहभाग मानण्यात आला आहे. यामागे उदारपणा वाटेल. परंतु त्याचवेळी येथील तीव्र होत जाणारा संघर्ष दुसरीकडे वळविण्याचा, असंतोषाला वाट मोकळी करून देण्याचा एक प्रयत्न आहे. तर दुसरीकडे हातात न राहिलेल्या व पांढऱ्या हत्तीप्रमाणे पोसायला लागणाऱ्या तसेच ब्रिटिशांनी पाया घातलेल्या (वर्ण–जातीसदृश्य वर निमूळती होत जाणारी vertical) उच्च वर्ण–जातीय–वर्गीय नोकरशाहीचे काम "स्वयसेवी वृत्तीने" करणारी नवी यंत्रणा यातून उभी करायची आहे. या स्वयंसेवी वृत्तीमागे प्रारंभी जरी प्रामाणिक तळमळ असली तरी त्यानंतर तिची सूत्रे कधी राज्यकर्ता व बाह्य आर्थिक संस्थांकडे जातात हे याच प्रामाणिक सहकाऱ्यांच्या लक्षातही येत नाही. आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीत या प्रवृत्तीचा शिरकाव झाला आहे. या प्रवृत्तीला येथील प्रसार माध्यमे नेहमीच उचलून धरतात हा आजवरचा अनुभव आहे.

प्रसार माध्यमातून अधिक व सातत्याने चमकणाऱ्या चळवळी या बऱ्याचवेळा समाजाच्या वरच्या सामाजिक–सांस्कृतिक थरांच्याच चळवळी असतात. पर्यावरणाच्या प्रश्नावर कार्यरत चळवळी वा स्त्रीवादी–स्त्रीमुक्ती चळवळीतील अनेक सहकाऱ्यांची बहुजन समाजाच्या प्रश्नांबाबत नेमकी विरोधी भूमिका राहते हा अपघात नाही. येथील सामाजिक–सांस्कृतिक विशेष वास्तवाशी याचा संदर्भ आहे.

## आबाधित शाश्वत सत्ता : ढासळती औपचारिक राजकीय सत्ता

भारतात दोन सत्ता आहेत. एक : शाश्वत सत्ता (Permanent) आणि दोन : औपचारिक राजकीय सत्ता (Formal Political Power). पैकी औप. राजसत्तेमध्ये बदल झाले. काँग्रेस तीन वेळा पराभूत झाली आणि बिगर काँग्रेसी पक्ष सत्तेवर आले विविध राज्यातही तेच दिसते. परंतु धर्म, संस्कृती, भाषा, लिंग, अध्यात्म या शाश्वत सत्तेवर आजही ब्राह्मणी–वैदिक परंपरावाद्यांचेच साम्राज्य आहे. वर्ण–जाती व्यवस्था, स्त्रीगुलामी याविरुद्ध संघर्ष करणाऱ्या तमाम चळवळी आजवर कधी ना कधी अखेर अखेर औप. राज. सत्तेच्या संघर्षात उतरलेल्या दिसतात. त्यात काही चूक नाही. परंतू ही औप. राजसत्ता मागील तीन दशकात काँग्रेसेतर पक्षाकडे स्थिरावली नाही याचे एक प्रमुख कारण ती केवळ एकांगी राहिली तिचा आधार शाश्वत सत्ता आहे या सत्तेकडे पूर्णपणे दुर्लक्ष राहिले तिथे वैदिक परंपरावादी व स्त्री गुलामी समर्थक राष्ट्रीय स्वयंसेवक

(पान ६७ वर पहा)

# स्त्री मुक्ती चळवळ, अवलोकन – ४

☐ प्रा. अविनाश डोळस ☐

सर्वसाधारणपणे इ. स. १९७५ पासून आपल्याकडे स्त्री मुक्तीसंबंधी आग्रहपूर्वक चर्चा सुरू झाल्याचे दिसते. यापूर्वी स्त्रियांचा सहभाग असणाऱ्या चळवळी अस्तित्वात होत्या त्यातून स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधी काही मागण्या सरकारकडे, कारखान्याच्या व्यवस्थापनाकडे केल्या गेल्या, जात होत्या. विशेषत: कारखान्यात व सरकारी कचेऱ्यात स्त्रीकामगार व कर्मचाऱ्यांसंबंधी काही विशिष्ट मागण्यांचा आग्रह धरला जात होताच. कामगार चळवळीत देखील बाळंतपणाच्या रजेसाठी एक सतत प्रयत्न होत होता त्याचबरोबर रोजगार हमीसारख्या योजनेतदेखील स्त्री–पुरुष भेद न करता त्यांना समान मोबदला दिला पाहिजे असा विचार स्वीकारला गेला होता. हळूहळू स्त्री–पुरुषांना समान वेतन सर्वच क्षेत्रात मिळावे यासाठी विविध कामगार संघटना, राजकीय पक्ष (विशेषत: डावे), काही युवक संघटना (उदा. श्रमिक संघटना, छात्र संघर्ष वाहिनी, युक्रांद, दयुआ, रिस्टुफे इ.) यांनी यासाठी सतत पाठपुरावा करून तत्त्व म्हणून वेतन समानतेचा विचार स्वीकारावा यासाठी प्रयत्न केले होते. या सर्व राजकीय, सामाजिक, युवकांच्या संघटनात स्त्रीयांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होताच परंतु केवळ स्त्री म्हणून वेगळया संघटनेचे अस्तित्व असावे ही जाणीव जागतिक महिला वर्षानंतर अधिक झाल्याचे दिसते.

स्त्रीमुक्ती चळवळीने पुष्कळ काही साध्य केल्याचे चित्र आज आपणास बघावयास मिळते. विशेषत: स्त्री म्हणून असलेल्या खास प्रश्नांसंबंधी या चळवळीने जी जाणीव निर्माण केली आहे ती महत्त्वाची म्हटली पाहिजे. स्त्रीसंबंधीचा विचार या गोष्टीला त्यामुळे एक स्वतंत्र असे स्थान मिळाले आहे त्याचबरोबर कायद्यामधील बदल घडवून आणण्यासही या चळवळीचा फार मोठा वाटा आहे. हुंडाविरोधी कायदा, बलात्कारासंबंधीच्या कायद्यात स्त्रीच्या म्हणण्याला दिले जाणारे महत्त्व, कुटुंब न्यायालये, महिला आयोग यासारख्या कायदेशीर गोष्टी घडवून आणण्यात स्त्री मुक्ती चळवळीचा सहभाग मोठाच आहे. एवढेच नव्हे तर प्रकर्षाने या मागण्या करून त्यांचा सातत्याने पाठपुरावा करून त्या अंमलात याव्यात यासाठी या चळवळीचे योगदान मोठे आहे, त्याबद्दल शंका असण्याचे कारण नाही.

स्त्रीमुक्ती चळवळीमुळे स्त्री–पुरुषांच्या लैंगिक संबंधाचीही एक खुली व मुक्त चर्चा समाजात सुरू करण्याचीही महत्त्वाची जबाबदारीही पार पडली आहे असे आपणास म्हणावे लागेल. फार वर्षांपूर्वी अशी एक चर्चा म. फुल्यांच्या काळात झाल्याचे दिसते. डॉ. राम मनोहर लोहियांनीही अशी एक चर्चा आपल्या लेखनातून, भाषणातून नंतरच्या काळात केल्याचे दिसते. परंतु या दोन्हीही चर्चा पुढे विकसित करून समाजापुढे मांडल्या गेलेल्या नाहीत. म. फुल्यांनी, ताराबाई शिंदयांनी स्त्री-पुरुषांच्या समतेच्या संदर्भात सुरू केलेली चर्चा त्यांच्या अनुयायांनी फारशी पुढे नेलेली नाही. उलट स्त्री–पुरुषांच्या लैंगिक व्यवहाराची जाहीर चर्चा करणे फारसे शिष्टसंमत समजले गेले नाही. त्यामुळे १९७५ नंतर स्त्रीमुक्तीवाल्यांनी सुरू केलेली अशी चर्चा समाजामध्ये स्त्रीपुरुष संबंध तपासून घेण्यास उपयुक्त ठरली. विशेषत: स्त्रीने अशा चर्चेत पुढाकार घ्यावा अशी आपल्याकडे पद्धत नव्हती. अशावेळी स्त्री मुक्तीवाल्यांनी ती घडवून आणली. त्यातून स्त्री–पुरुष संबंधाबाबत जो एक डेडलॉक होता तो पुष्कळसा मोकळा झाला. छाया दातारचे लेखन, लिना मोहाडीकरांचे लेखन अशासारख्यांचे लेखन यादृष्टीने पाहण्यासारखे आहे. त्यातून तरुण-तरुणींच्या बोलण्यात–वागण्यात एक प्रकारचा न्यूनगंडरहित, भितीरहित असा भाग आला. स्त्री–पुरुषांना एकमेकास समजून घेण्यास ते अधिक सहाय्यभूत ठरले.

स्त्रियांचे अस्तित्व ठळकपणे ॲक्टिव्ह लोकांना

जाणवू लागले. त्यामुळे कुठल्याही चळवळीत महिला हव्यात असे एक भान चळवळीतील लोकांनादेखील येऊ लागले त्यामुळे १९७५ नंतरच्या सर्वच चळवळीत स्त्रियांचा सहभाग ही वाढला तो वाढावा यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला गेला राजकीय पक्षांनीही आपापल्या महिला संघटना बांधून त्या फोकस कशा होतील याकडे लक्ष द्यायला सुरुवात केल्याचे दिसते. त्याचबरोर साहित्याच्या क्षेत्रातही स्त्री आणि तिचे स्वातंत्र्य, स्त्री आणि तिचे हक्क यासंबंधी कथा, कादंबरी, नाटक, या वाङ्मय प्रकारात जास्तीचे स्थान मिळू लागल्याचे दिसते स्त्री ही भोगदासी आहे. नशीबाने जे दिले ते सहन करणारी आहे हे चित्र जाऊन तिच्या स्वातंत्र्याबाबत अधिक लिहिले जावू लागले. पारंपारिक स्त्रीलेखिकेपेक्षा नव्या स्त्रीलेखिका ही गोष्ट आवर्जून मांडू लागल्या. त्यात स्त्रीपुरुष समतेपेक्षा अनेकदा स्त्रीपुरुष शरीरसंबंधाबाबत अधिक लिहिले जावू लागले ही गोष्टही तेवढीच खरी आहे. स्त्रीस्वातंत्र्याची संकल्पना ही अनेकदा समतेच्या मूल्याशी न जोडता ती तिच्या शरीरसंबंधाच्या स्वातंत्र्याशी निगडीत राहू लागली हे मान्य करूनही साहित्यामध्ये स्त्रीसंबंधीची एक जाणीव प्रकर्षाने व्यक्त होऊ लागली, त्याचे कारणही स्त्रीमुक्ती चळवळ आहे हे कबूल करावे लागते. अर्थात सर्वसाधारण मराठी साहित्य सतत समाजातील चळवळीकडे पाठ फिरवून कल्पनेतच रंगल्याचे दिसते. ते या चळवळीच्याबाबतीतही घडले आहे. त्यामुळे सर्व मराठी साहित्यावर फार मोठा प्रभाव पडावा एवढे सामर्थ्य या चळवळीने प्राप्त केले आहे असे मात्र दिसत नाही. दलित–ग्रामीण साहित्याच्या तुलनेनेही बघितले तरी स्त्री–मुक्ती चळवळीचा आवाज क्षीणच आहे असे दिसते.

स्त्रीमुक्ती चळवळ ही विशेषत: शहरी भागातच कार्यरत असल्याचे दिसते. त्यातही ती उच्च मध्यवर्गीय शिक्षित, ब्राह्मणी स्त्रियांचीच चळवळ बनली आहे. अपवाद म्हणून काही सांगता येतील. परंतु प्रामुख्याने ज्या स्त्रियांच्या प्राथमिक गरजा भागल्या होत्या, त्यांचा वर्गही बदलला होता. त्यांच्या गरजाही बदलल्या होत्या अशा नोकरी करणाऱ्या स्त्रियांना हुंडा, लैंगिक अत्याचार या विरोधात आवाज उठविणे गरजेचे झाले होते. लैंगिक गरजेपेक्षा लैंगिक जाणीव होण्याची एक मानसिक पातळी गाठली गेल्याने लैंगिक अत्याचारासंबंधीची, त्या संबंधीच्या प्रश्नांसंबंधीची जाणीव तीव्र झाली होती. अशा स्त्रियांकडेच स्त्रीमुक्तीचे नेतृत्व असल्याने त्यांना असेच प्रश्न अधिक महत्त्वाचे वाटले. स्त्रीमुक्ती चळवळीचे ते प्रश्न बनले. साहजिकच स्त्रीमुक्ती चळवळ यासारख्या प्रश्नांभोवतीच केन्द्रित झाली. त्यामुळे कार्यकर्त्यांचा संच असूनही एका जातीपलीकडे, वर्गापलीकडे तिला फारसे स्थान मिळू शकले नाही. त्या चळवळीला स्त्रीमुक्तीचे स्वरूपही एका मर्यादेपलीकडे प्राप्त होऊ शकले नाही. ग्रामीण, दलित, आदिवासी, भटके–विमुक्त अशा स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधीचे आकलन करण्यास या चळवळीला साहजिकच मर्यादा पडल्या. देवदासी, वेश्या, यासारख्या समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या प्रश्नांसंबंधी चळवळीला फार काही करता आले नाही. मूळात भारतीय समाजव्यवस्थेच्या विरोधात काही एक ठोस भूमिका स्त्री मुक्तीवाल्यांनी न घेतल्यामुळे त्यांचा पाया हुंडाविरोध, हुंडाविरोधी कायदा, हुंड्यासाठी होणाऱ्या अत्याचारांना विरोध, कौटुंबिक अत्याचार विरोधलैंगिक, अत्याचारविरोध असाच राहात गेला. त्याचे स्वरूपही समाजव्यवस्था बदलण्यापेक्षा त्यात सुधारणा घडवून आणाव्यात असेच राहात आले आहे साहाजिकच ठिकठिकाणी प्रामाणिक कार्यकर्त्या मिळूनही या चळवळीला आपला परिघ वाढविता आलेला नाही.

स्त्रियांवरील अत्याचाराला दोन घटक जबाबदार आहेत. एक : येथील विषमताप्रणीत धर्माचे अधिष्ठान लाभलेली समाजव्यवस्था. दोन : येथील पुरुषांचे समाजातील व्यवस्थेने ठरविलेले स्थान व स्त्रियांचे स्थान. त्यात स्त्री ही भोगदासी, पायातील खेटर, पापाची गंगोत्री, अबला, विश्वासघातकी, मोहमायेचे आगर, चंचल, मूर्ख आणि अर्धांगीनी अशी असल्यामुळे मालक आणि भोगवस्तू असे तिचे पुरुषांशी नाते मानले आहे. ब्राह्मणी वा वैदिक धर्माने त्याला मान्यता देऊन धर्माज्ञाचे स्वरूप दिले आहे. यातून तिने नवऱ्यासाठी जीवंत मरण्यातच तिचा मोक्ष आहे ही शिकवण आहे. 'पती हा परमेश्वर आहे', त्याचबरोबर जातीतच विवाह करण्यामुळे धर्मरक्षण होते, त्यासाठी तिने जातीतच लग्न केले पाहिजे या साऱ्या रूढी परंपरेचा, विचाराचा बळी म्हणून तिच्यावर अत्याचार होतात. तिला

ब्राह्मणीधर्मातून, जातीतून मुक्त केल्याशिवाय तिचे हाल संपणार नाहीत. धर्मरक्षण, जातीचे रक्षण करण्यासाठी तिला सहन करावा लागणारा छळ तिने ब्राह्मणीधर्म, जात नाकारल्याशिवाय संपणारा नाही. खानदानाची कल्पना जोपर्यंत तिच्या योनीशूचितेशी संबंधीत आहे तोपर्यंत योनीसंरक्षणाच्या नावाखाली केले जाणारे अत्याचार थांबणार नाहीत. अन्याय होणाऱ्या वा करणाऱ्या व्यवस्थेचा मी बळी होणार नाही ही भूमिका जोपर्यंत ती घेत नाही व त्याविरोधात ती बंड करत नाही तोपर्यंत सजविलेली, नटवलेली, विकत घेतलेली वा आपल्यामुळे उद्धारलेली स्त्री असे चित्र राहात जाणार आहे. यासंबंधीचा विचार गांभीर्याने करून फुले आंबेडकरांच्या विचाराचे वारसदार बनणे ही गरज आहे असे मला वाटते.

स्त्रीमुक्ती चळवळ ही आज १९७५–८५ च्या तुलनेत कार्यरत आहे असे दिसत नाही. १९८५ पासून या चळवळीचे कार्य थंडावले आहे. अनेक कार्यकर्त्या नेत्या म्हणून नावारूपाला आल्या आहेत. त्यांनी १९७५ ते ८५पर्यंत केलेल्या बहुतांशी मागण्या मान्य झाल्या आहेत. ग्रामीण भागात चळवळ मूळ धरू शकलेली नाही ज्या पूर्वीपासून कम्युनिस्ट चळवळीत होत्या त्या नेत्या आजही ग्रामीण भागाशी संबंध राखून आहेत. पण त्या मूळातच डाव्या चळवळीतील कार्यकर्त्या होत्या हेही येथे ध्यानात ठेवावे लागेल. त्यातही डाव्या चळवळीला उत्तरोत्तर येत जाणारी मर्यादा व त्यांची घटत जाणारी ताकद यातून परिवर्तनवादी चळवळीला आलेली शिथिलता यामुळे एकूणच परिवर्तनवादी चळवळ थंडावली आहे. त्यातही डाव्या चळवळीने, समाजवादी चळवळीने लोकसमूहाची असलेली आंबेडकरी चळवळ कधी समजावून घेतली नाही. या चळवळीशी निवडणुकीच्या व्यवहाराशिवाय कधी नाते जोडण्याचा प्रयत्न केला नाही. स्त्रीमुक्ती चळवळीने यापेक्षा दूसरे काही केले नाही. आपल्या चळवळीपूर्वीपासूनच येथे भ. बुद्धाचा, फुल्यांचा वारसा सांगणारी भारतीय परंपरा आंबेडकर चळवळ पुढे चालवित आहे, एवढेच नव्हे तर ती त्याचे नेतृत्व करत आहे. त्यात लाखो स्त्री–पुरुष सहभागी होताहेत. परिवर्तनवादी चळवळीचे ते आजचे नेते आहेत. त्यांनी ब्राह्मणी धर्म, जातीव्यवस्थेविरुद्ध युद्ध पुकारले आहे, याचे भान जातीअहंगंडामुळे स्त्रीमुक्तीवाल्यांना ठेवता आलेले नाही त्यामुळे त्यांच्यापुढे दु:ख व्यक्त करायला माणसे मिळत नाहीत असे म्हणायची पाळी आली आहे. आपण स्वत: नेते आहोत व इतर आपले अनुयायीच असले पाहिजेत ह्या ब्राह्मणी अहंकारातून चळवळीला बाहेर पडता आले नाही हे खरे कारण आहे. लोकचळवळीशी, परिवर्तनवादी चळवळीशी स्त्रीमुक्तीने आपले नाते नव्याने सांगणे आवश्यक आहे. त्याचबरोबर दलित–बहुजन, आदिवासींचे नेतृत्व मान्य करून चळवळीचे स्वरूप बदलणे आवश्यक आहे.

स्त्रीमुक्ती चळवळीला प्रस्थापित प्रसार माध्यमांनी प्रसिद्धी दिली. प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या विरोधात जोपर्यंत ही चळवळ काही बोलत नाही वा काही कृती करत नाही तोपर्यंत चळवळीला प्रसिद्धी मिळत राहील. एवढेच नव्हे तर वाचक, प्रेक्षक समोर ठेवून स्त्री–पुरुषांच्या लैंगिक प्रश्नांचा उहापोहासही भरपूर जागा वा वेळ देऊन ते आपला व्यवसाय वाढवतील त्यात नवल असे काही नाही. खरा प्रश्न त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक-राजकीय हितसंबंधांना चळवळ जेव्हा शह देईल तेव्हा हीच प्रसारमाध्यमे स्त्रीचळवळीच्या विरोधात उभे राहतील व तिला गप्प बसवतील. अनेक स्त्रीमुक्तीवाल्यांनी बाबरी मशीद पाडल्याबद्दल निषेध नोंदविलेला नाही व स्त्रीनिर्भत्सना करणारे वक्तव्य करणाऱ्या सेनाप्रमुख बाळ ठाकरे यांचाही निषेध नोंदविलेला नाही, ही गोष्ट येथे आवर्जून सांगविशी वाटते. राजकीय लोक स्त्रीमुक्तीवाल्यांचा उपयोग कसा करून घेतात याची काही उदाहरणे आपल्यासमोर आहेतच. तसेच स्त्रीमुक्ती चळवळीचे स्वरूप हे व्यक्तीवादी असेच अधिक राहात गेले आहे. समूहाने ही चळवळ फार कमी वेळा व्यक्त झाली आहे. व्यक्तीवर अवलंबून असलेल्या चळवळीतील नेत्यांना त्यांचे मानसन्मान देऊन सरकारचा एक भाग बनविणे हे कुठल्याही शासनव्यवस्थेच्या कार्याचा एक भाग असतो. स्त्रीमुक्तीवाल्यांनाही त्यांनी आपल्या रथाला जुंपून टाकले आहे. आंबेडकर चळवळीसारखीच हेवेदावे, अध्यक्षपदासाठीची चाललेली धडपड, विविध कमिट्यांसाठी सरकारी दरबारी खेट्या घालणे इ.

(पान ६७ वर पहा)